लोकमत

पॉझिटिव्ह स्टोरी

## रेल्वे मंत्रालयाला दिला प्रस्ताव, चार-पाच महिन्यात सुरू होणार नवीन गाडी

# नवीन वर्षात धुळेकरांना मिळणार पुणे रेल्वेची भेट

अतुल जोशी
लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** धुळ्याहून पुण्याला नोकरी, शिक्षणासाठी जाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. मात्र धुळ्याहून पुण्यासाठी स्वतंत्र रेल्वे नसल्याने, प्रवाशांचे हाल होत असतात. ही बाब लक्षात घेऊन येत्या चार-पाच महिन्यात धुळे-पुणे रेल्वे सुरू होणार आहे. यासंदर्भात रेल्वे मंत्रालयाला प्रस्ताव दिलेला आहे, अशी माहिती खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी 'लोकमत'शी बोलताना दिली.

धुळेसह परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी, काहीजण नोकरीसाठी पुण्याला स्थायिक झालेले आहेत. अशा सर्वांचे धुळ्याला नेहमीच येणे-जाणे असते. मात्र धुळ्याहून पुण्याला अथवा पुण्याहून धुळ्याला येण्यासाठी स्वतंत्र रेल्वे नसल्याने, प्रवाशांना खासगी बस अथवा महामंडळाच्या बसनेच प्रवास करावा लागतो. मात्र त्याचे तिकीट दर जास्त असल्याने, सर्वसामान्यांना ते परवडत नाही. त्यामुळे धुळ्याहून पुण्यासाठी स्वतंत्र रेल्वे सुरू करावी, अशी प्रवाशांसोबतच विविध राजकीय पक्षांची अनेक वर्षांची मागणी आहे. आता ही मागणी या नवीन वर्षात साकारण्याची शक्यता आहे. किमान मे पर्यंत ही नवीन रेल्वे सुरू होऊ शकते.

### रेल्वे मंत्रालयाला दिला प्रस्ताव

- धुळ्याहून पुण्यासाठी स्वतंत्र रेल्वे सुरू करण्यात यावी, यासाठी रेल्वे विभागाला काही महिन्यांपूर्वीच प्रस्ताव देण्यात आलेला आहे.
- रेल्वे मंत्रालयानेही या नवीन रेल्वेबाबत सकारात्मकता दर्शविली आहे. लवकरच ही गाडी सुरू होऊ शकते.




### पूर्वी पॅसेंजरला लागत होती बोगी

- कोरोनाची लाट येण्यापूर्वी धुळ्याहून सायंकाळी सुटणाऱ्या पॅसेंजरला पुण्यासाठी दोन बोगी लावण्यात येत होती. या बोगी चाळीसगावला महाराष्ट्र एक्स्प्रेसला जोडण्यात येत होत्या. मात्र कोरोनानंतर पुण्याला जाण्यासाठी या दोन बोगी लावणे बंद झाले आहे.

### शिंदखेडा, दोंडाईचा मार्गे भुसावळ-सातारा नवीन रेल्वे प्रस्तावित

- धुळ्यासोबतच नरडाणा, शिंदखेडा, दोंडाईचा या भागतूनही पुण्याला नोकरी, शिक्षणासाठी जाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे.
- पश्चिम रेल्वेच्या भुसावळ-सुरत रेल्वे मार्गावर मुंबईला जाण्यासाठी स्वतंत्र रेल्वे असली तरी पुण्यासाठी रेल्वे नाही. त्यामुळे या मार्गावरूनही पुण्यासाठी स्वतंत्र रेल्वे सुरू करण्यात यावी, अशी प्रवाशांची मागणी आहे.
- प्रवाशांची असलेली मागणी लक्षात घेऊन काही महिन्यांपूर्वी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भुसावळ-सातारा व्हाया शिंदखेडा, दोंडाईचा ही नवीन एक्स्प्रेस सुरू करण्याचे आश्वासन दिलेले आहे.
- ही नवीन एक्स्प्रेसही नवीन वर्षात सुरू होण्याची संभावना आहे. तसे झाल्यास, शिंदखेडा, दोंडाईचा भागातील प्रवाशांचीही सोय होणार आहे.

### धुळे- मुंबई एक्स्प्रेसला मिळतोय प्रतिसाद

गेल्यावर्षी प्रायोगिक तत्वावर धुळे-मुंबई ही स्वतंत्र एक्स्प्रेस सुरू करण्यात आली होती. पहिल्या टप्यात या एक्स्प्रेस गाडीला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे या गाडीला मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर नोव्हेंबर २२ मध्ये ही एक्स्प्रेस कायम करण्यात आली. या गाडीला प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळतोय.

धुळ्याहून पुण्याला जाणाऱ्या प्रवाशी,विद्यार्थ्यांची मोठी संख्या आहे. येथून स्वतंत्र पुणे गाडी सुरू करावी अशी प्रवाशांची मागणी आहे. या संदर्भात रेल्वे मंत्रालयाला प्रस्ताव दिला आहे. येत्या चार-पाच महिन्यात पुणे रेल्वे सुरू होईल.

**डॉ. सुभाष भामरे**, खासदार, धुळे

Hello Dhule
Page No. 2 Jan 01, 2024
Powered by: erelego.com